-: प्रेसनोट दिनांक - १२/०२/२०१९ :-

**आरोपी लोकसेवक शिवाजी चंदर कोळी, वय-५३, तलाठी सजा कणेरी व करंजफेण ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर, रा.मु.पो.बोरपाडळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर वर्ग-३ व खाजगी उमेदवार सुशांत बाजीराव लव्हटे, वय-२३, रा.कुंभार गल्ली, कोतोली, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यांनी लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहात पकडलेबाबत.**

---

तक्रारदार यांनी कणेरी पैकी धनगरवाडा येथील जमीन गट नंबर ५३३ मधील ३२ गुंठे व जमीन गट नंबर ५३४ मधील साडेचार गुंठे जमीन खरेदी केली आहे. तसेच शिंदेवाडी गावातील जमीन गट नंबर ५८९ मधील ७० गुंठे जमीनीचा वारसा हक्क करुन देणेबाबतचा व्यवहार केला आहे.

तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या जमीनीच्या ७/१२ उता-यावर तक्रारदार यांचे नाव लावण्यासाठी व गट नंबर ५८९ मधील जमीनीचे ७/१२ उता-यावर वारसा नोंद करणेसाठी कणेरी गावचे तलाठी शिवाजी कोळी यांची भेट घेतली. त्यावेळी कणेरी गावचे तलाठी शिवाजी कोळी यांनी तक्रारदार यांना खरेदी केलेल्या जमीनीच्या ७/१२ उता-यावर तक्रारदार यांचे नाव लावण्यासाठी व गट नंबर ५८९ मधील जमीनीचे ७/१२ उता-यावर वारसा नोंद करणेसाठी १०,०००/- रुपये द्यावे लागतील असे सांगून त्यांच्याकडे १०,०००/- रुपये लाचेची मागणी केली. त्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक ११/०२/२०१९ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर कार्यालयाकडे कणेरी गावचे तलाठी शिवाजी कोळी यांचेविरुध्द तक्रार दिली.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे दिनांक १२/०२/२०१९ रोजी शासकीय पंच साक्षीदार यांचे समक्ष कणेरी गावकामगार तलाठी कार्यालयामध्ये लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणी मध्ये कणेरी गावचे तलाठी शिवाजी कोळी यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांनी खरेदी केलेल्या जमीनीच्या ७/१२ उता-यावर तक्रारदार यांचे नाव लावण्यासाठी व गट नंबर ५८९ मधील जमीनीचे ७/१२ उता-यावर वारसा नोंद करणेसाठी १०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ५०००/- रुपये लाचेची रक्कम लागलीच कणेरी तलाठी कार्यालयामध्ये घेवून येण्यास सांगितलेचे निष्पन्न झाले.

त्याप्रमाणे आज दिनांक १२/०२/२०१९ रोजी तलाठी शिवाजी चंदर कोळी यांचेविरुध्द कणेरी येथील तलाठी कार्यालयामध्ये सापळयाचे आयोजन केले असता तलाठी शिवाजी कोळी यांनी तक्रारदार यांचेकडे पंच साक्षीदार यांचे समक्ष ५,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारली आणि ती लाच रक्कम तलाठी शिवाजी कोळी यांनी त्यांच्या सोबत असणारा खाजगी उमेदवार सुशांत लव्हटे यांचेकडे दिली असता त्यांना रंगेहात पकडणेत आले असून त्यांच्याविरुध्द पन्हाळा पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे गुन्हा नोंद करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री.संदिप दिवाण पोलीस उप आयुक्त / पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री.राजकुमार गायकवाड, अपर पोलीस उप आयुक्त / अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार, पोलीस उप अधीक्षक, श्री.गिरीष गोडे, पोलीस निरीक्षक, श्री.मारूती पाटील, सहायक फौजदार शाम बुचडे, पोलीस नाईक शरद पोरे व पोलीस कॉन्स्टेबल कृष्णात पाटील, रुपेश माने अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाचलुचपंत प्रतिबंधक विभाग,म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे**
**दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३**

**३) श्री.गिरीष गोडे , पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर मो.नं. - ८१०८६६०७०७**
**दुरध्वनी कमांक :- ०२३१/२५४०९८९.**

**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक :- १०६४.**

**५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३**